केंद्राच्या यादीवरचे व राज्यशासनाच्या यादीवरचे संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होणारे दैनिक



दैनिक
RNI. NO. MAHMAR 2011/39185
# राजस्व



सोलापूर ▸ वर्ष १५ वे ▸ १५० | मराठी सायंदैनिक | ▸▸ गुरुवार २२ ऑक्टोबर २०२६

## कराळे मास्तरांची शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून ६ वर्षांसाठी हकालपट्टी, पक्ष शिस्तीचं उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते नितेश कराळे मास्तर यांनी बंडखोर केली आहे. यानंतर पक्षाने मोठा निर्णय घेतला आहे. कराळे मास्तर यांची ६ वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अभिजीत वंजारी यांना पाठिंबा दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने याबाबत अधिकृत पत्राक जारी केले आहे.

निवडणुकीत शरद पवारांचा आशीर्वाद आपल्याला असल्याचा संभ्रम निर्माण केल्याप्रकरणी कारवाई पक्ष शिस्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी नितेश कराळे गुरुजी यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. नागपूर पदवीधर निवडणुकीत पक्षाच्या निर्णयाचा विरोधात जाऊन अपक्ष उमेदवारी अर्ज भरणे आणि आपल्याला शरद पवारांचा आशीर्वाद निवडणुकीत असल्याचा संभ्रम निर्माण केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. पक्षाचे सरचिटणीस रविंद्र पवार यांच्या सहीचे कारवाई करणारे पत्र एबीपी माझाच्या हाती लागले आहे. नितेश कराळे गुरुजी सोशल मीडियात वादग्रस्त वक्तव्य आणि आपल्या शिकवण्याच्या वेगळ्या पद्धतीमुळे प्रसिद्ध आहेत. गेल्या काही दिवसांपासून कराळे यांनी आघाडीविरोधात प्रचार केला होता. आता मतदानाच्या अवघ्या काही तासापूर्वी झालेल्या या कारवाईचा निवडणुकीवर काय परिणाम होणार, याकडे लक्ष लागलंय.

निवडणुकीत शरद पवारांचा आशीर्वाद आशिर्वाद असल्याचे सांगणे ही आपली कृती पक्षाची शिस्त, धोरणे आणि महाविकास आघाडीच्या निर्णयांचे स्पष्ट उल्लंघन करणारी आहे. यामुळे, पक्षशिस्तीचे उल्लंघन केल्याबद्दल पक्षाचे प्रदेशाध्यक्ष / वरिष्ठ नेतृत्वाच्या निर्देशानुसार आपणास पक्षातून ६ वर्षांकरिता निष्कासित करण्यात येत आहे, याची आपण नोंद घ्यावी असं पत्रात म्हटलं आहे. शरद पवार पक्षाचा काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अभिजीत वंजारी यांना पाठिंबा



नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाच्या काही तास आधी महत्वाची घडामोड घडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बंडखोर उमेदवार नितेश कराळे यांची सहा वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. एवढेच नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अभिजीत वंजारी यांना पूर्ण पाठिंबा ही जाहीर केला आहे. महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजित वंजारी यांच्याविरोधात निवडणूक लढवणं आणि शरद पवारांचा पाठिंबा आपल्याला असल्याचा मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केल्याचा ठपका नितेश कराळे यांच्यावर ठेवण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून कराळे यांनी आघाडीविरोधात प्रचार करत होते. आता मतदानाच्या अवघ्या काही तासापूर्वी झालेल्या या कारवाईचा निवडणुकीवर काय परिणाम होणार, याकडे लक्ष लागलंय.

## मराठा समाजाला न्याय देण्याबाबत शिंदेंचं योगदान

मुंबई : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केला. माझ्या नावाने भाजपकडून ५०० कोटी रुपये घेतल्याचं बोललं जात असल्याचा खळबळजनक आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. याचा पुरावा म्हणून ऑडीओ क्लिप असल्याचे देखील जरांगे यांनी म्हटले. आता या कथित ऑडीओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. यावर शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी प्रतिक्रिया दिली आहे. रामदास कदम पत्रकार परिषदेवेळी म्हणाले, मनोज जरांगे पाटील साहेब आज तुम्ही जी क्लिप दाखवली ती १४/१०/२०२४ ची आहे. तुम्ही ही क्लिप दोन वर्ष का ठेवली. आज एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री आहेत, मराठा समाजाला न्याय देण्यासाठी त्यांनी योगदान दिलं आहे, विनोद पाटीलला विचारून घ्या, सर्वोच्च न्यायालयाचा कायदेशीर अभ्यासाबाबत चर्चा कोणाच्या बंगल्यावर झाल्या, असा सवालही रामदास कदम यांनी उपस्थित केला



आहे.एक गोष्ट मला पहिल्यांदा जरांगे पाटील साहेब यांना सांगायला हवी की आपण आज मराठा समाजाला न्याय देण्यासाठी दिवस रात्र मेहनत घेताय, कष्ट घेताय, उपोषण करताय, असं असताना ही जी क्लिप आपण आज दाखवली, ती क्लिप १४/१०/२०२४ ची आहे. मग हे दोन ते अडीच वर्ष क्लिप आपण आपल्याकडे का ठेवली होती? यामागचं नेमकं कारण काय? ते पण कळलं पाहिजे ना. २०२४, २५, २६ आणि म्हणून काही गोष्टी स्पष्ट होणं गरजेचं आहे. एकनाथ शिंदे साहेब, आधी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते आणि आता उपमुख्यमंत्री आहेत. मराठा समाजाला न्याय देण्याबाबत एकनाथ शिंदे साहेबांचं देखील योगदान आहे. त्यांचं योगदान आहे.

## शिवसेना आमदार बच्चू कडूंसह सहा जणांवर गुन्हा दाखल

शिवसेना नेते आणि आमदार बच्चू कडूंसह सहा जणांवर घुग्घुस पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल



करण्यात आला आहे. विनापरवानगी आंदोलन व पोलिसांवर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल झाला आहे. स्थानिक भूमिपुत्रांना वेकोलिमध्ये ८० टक्के नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे यासह इतर मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी १८ तारीख म्हणजेच रविवारी एक मोर्चा आयोजित केला होता. या मोर्चादरम्यान विनापरवानगी आंदोलन व पोलिसांवर आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यामुळं त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

बेकायदेशीर जमाव जमवणे आणि भाषणादरम्यान पोलीस प्रशासन व तहसीलदारांविषयी अत्यंत प्रक्षोभक विनापरवानगी मोर्चा काढणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि भाषणादरम्यान पोलीस प्रशासन व तहसीलदारांविषयी अत्यंत प्रक्षोभक, अश्लील वक्तव्य करून धमकी दिल्याप्रकरणी माजी राज्यमंत्री तथा आमदार बच्चू कडू यांच्यासह सहा जणांवर घुग्घुस पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आमदार बच्चू कडू (रा. बेलोरा, अचलपूर, अमरावती), शिवसेना (शिंदे) चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा संघटक मुकेश मनोजराव जिवतोडे (रा. वरोरा), रोशन राजाराम हरबडे (रा. नांदा फाटा, कोरपना), अमोल नथ्थूजी मांढरे (रा. घुग्घुस), नथ्थू भाऊराव नवले (रा. नकोडा, घुग्घुस), सतीश बीडकर (रा. गडचांदूर) यांच्यावर बीएनएस २०२३ मधील कलम १९०, १९१ (२), २९६, २२३, २२४, ३५१ (२) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## युवराज संभाजीराजे छत्रपती आणि पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांची बंगळुरूमध्ये भेट

भारत दौऱ्यावर असलेले पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क व युवराज संभाजीराजे छत्रपती यांची शुक्रवार २३ ऑक्टोबर रोजी बेंगळुरू येथे विशेष भेट होणार आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील मानवी इतिहासातील एका अत्यंत महत्त्वपूर्ण पर्वाची स्मृती जतन करण्यासाठी संभाजीराजे यांनी पुढाकार घेतला आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सन १९४२ ते १९४८ या सात वर्षांच्या कालावधीत कोल्हापूरच्या



छत्रपती घराण्याने सुमारे ५००० निर्वासित पोलिश नागरिकांना आश्रय दिला होता. त्यांच्यासाठी कोल्हापूरजवळील वळीवडे येथे विशेष छावणी उभारण्यात आली होती. या कालावधीत कोल्हापूरच्या जनतेने या पोलिश नागरिकांना निर्वासित म्हणून नव्हे, तर आपल्या पाहुण्यांप्रमाणे सन्मानाने आणि आत्मीयतेने सांभाळले. अशा कठीण काळात कोल्हापूरच्या जनतेने छत्रपती राजघराण्याच्या आश्रयाखाली पोलिश निर्वासितांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यांना या प्रदेशात सुरक्षितता आणि दुसरे घर मिळाले. यातून दोन्ही देशांच्या नागरिकांमध्ये ऋणानुबंधांचे संबंध निर्माण झाले व भारत - पोलंड द्विराष्ट्रीय मैत्रीचा पाया रचला गेला. ही मैत्री व ऋणानुबंधांचे संबंध पुढे घेऊन जाण्यासाठी संभाजीराजे छत्रपती हे सातत्याने कार्यरत आहेत. संभाजीराजे यांच्या पुढाकारातून वळीवडे येथे निर्वासित छावण्यांची स्मृती जपण्यासाठी संग्रहालय साकारले जात आहे.

प्रस्तावित संग्रहालयात ऐतिहासिक दस्तऐवज, वैयक्तिक आठवणी, छायाचित्रे आणि ऐतिहासिक वस्तू यांच्या माध्यमातून हा वारसा जतन केला जाणार आहे. त्याचबरोबर सांस्कृतिक देवाणघेवाण, शैक्षणिक उपक्रम आणि भारत-पोलंडमधील नागरिकांमधील परस्पर संवादासाठी एक कायमस्वरूपी व्यासपीठही निर्माण केले जाणार आहे. सध्याच्या कार्यक्रमातील वेळापत्रक आणि तांत्रिक अडचणींमुळे पोलंडच्या पंतप्रधानांचा प्रस्तावित कोल्हापूर दौरा आयोजित करणे शक्य झाले नाही. तथापि, २०२७ च्या सुरुवातीला पोलंडचे एक मोठे शिष्टमंडळ कोल्हापूरला भेट देण्याची अपेक्षा आहे. त्यावेळी भारत आणि पोलंडच्या सहभागातून या संग्रहालयाचे भव्य उद्घाटन करण्याची संकल्पना आहे. या पार्श्वभूमीवर संभाजीराजे व पंतप्रधान टस्क यांची बेंगळुरू येथे होणारी भेट विशेष महत्त्वपूर्ण आहे. या भेटीमुळे या उपक्रमाला नव्याने गती मिळेल आणि संग्रहालय प्रकल्प प्रत्यक्षात साकार करण्यासाठी दोन्ही देशांची सामायिक बांधिलकी अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा आहे. या भेटीमुळे कोल्हापूर आणि पोलंड यांच्यातील ऐतिहासिक नातेसंबंध अधिक दृढ होणार असून सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक, तंत्रज्ञान आणि पर्यटन क्षेत्रात नव्या सहकार्याची दारे खुली झाली आहेत.

## एकनाथ शिंदेंबद्दल प्रश्न निर्माण करणं मान्य नाही, जरांगेंच्या ऑडिओ क्लिपवर भाजपची प्रतिक्रिया

मुंबई : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी एक ऑडिओ क्लिप जारी केली होती. यानंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी ऑडिओ क्लिपमध्ये आंदोलनाच्या बाबतीमध्ये जे काही उल्लेख आहेत, ते कोणी केलेत, कशासाठी केलेत, याची देखील सविस्तर चर्चा झाली पाहिजे, त्याची देखील चौकशी झाली पाहिजे, असं म्हटलं होतं. यानंतर भाजपची अधिकृत प्रतिक्रिया समोर आली आहे. भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी या कथित ऑडिओ क्लिपची चौकशी झाली पाहिजे, असं म्हटलं आहे.

आशिष शेलार काय म्हणाले? आशिष शेलार यांनी या कथित ऑडिओ क्लिपची चौकशी करण्यात यावी, सखोल चौकशी करण्यात यावी असं म्हटलं आहे. या सगळया प्रकरणात ही कथित ऑडिओ क्लिप बाहेर आली कशी, त्याची सत्यता किती आहे, यात तंत्रज्ञानाचा वापर झालाय का? चुकीच्या पद्धतीनं अवैध पद्धतींन केली गेलीय का? ऑडिओ क्लिप बाजारात आता का आणली, ती मनोज जरांगे यांच्याकडे का पोहोचवली गेली यासगळ्याची चौकशी झाली पाहिजे.

या सगळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत प्रश्न निर्माण करणं योग्य नाही. ऑडिओ क्लिपमधील तथाकथित चर्चा याच्याशी आमची असहमती आहे. याची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी आमची भूमिका असल्याचं आशिष शेलार यांनी म्हटलं आहे.

उदय सामंत यांचा गैरसमज झाला असेल, समज करुन घेतला असतं तर त्यांनी हे विधान केलं नसतं. ज्या ऑडिओ क्लिपची सत्यता फिक्स नाही, ज्याची चौकशी झालेली नाही. पूरक असा पुरावा नाही. ऑडिओ क्लिपमुळे सत्यता येऊ शकत नाही, त्यामुळं उदय सामंत यांचा गैरसमज



झाला असेल तर दूर करु, असं आशिष शेलार यांनी म्हटलं.

यात भाजपच्या कोणत्याही नेत्याचा आवाज नाही, ऑडिओ क्लिप सत्य आहे की नाही स्पष्ट झालेलं नाही. तंत्रज्ञानासंदर्भातील अशा गोष्टींना पूरक पुरावा लागला तर ते सत्य मानलं जातं, हे त्यांना माहिती नसेल तर त्यांचा गैरसमज दूर करु, असं आशिष शेलार म्हणाले.

# पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी सोलापूर जिल्हा प्रशासन सज्ज १९३ मतदान केंद्रांवर उद्या मतदान; १,१६५ कर्मचारी नियुक्त, मतदान साहित्य घेऊन पथके रवाना -जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

सोलापूर, दि. २२ : पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून, सोलापूर जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततेत आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी ११७, तर शिक्षक मतदारसंघासाठी ७६ अशी एकूण १९३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली असून, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी आवश्यक साहित्य घेऊन आपापल्या केंद्रांकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.

जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांतील मतदान प्रक्रिया व्यवस्थित पार पडावी, यासाठी मनुष्यबळ, मतदान साहित्य, वाहतूक, सुरक्षा, मतपेट्या आणि मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. निवडणूक कामकाजासाठी संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या असून, विविध स्तरांवर समन्वय ठेवण्यात येत आहे  मतदान साहित्याचे वाटप; पथके केंद्रांकडे रवाना

निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून दि. २१ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरावरून तालुकास्तरावर आवश्यक मतदान साहित्य, जंबो बॅलेट बॉक्स आणि मतपत्रिकांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी तिसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. प्रशिक्षणानंतर तालुकास्तरावरून मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी मतदानाचे साहित्य घेऊन संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाले.

मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी मतदान प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, साहित्याचा वापर आणि निवडणूकविषयक नियमांबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक तयारी पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. पदवीधर मतदारसंघात ४९ हजार ७२२ मतदार

जिल्हा निवडणूक कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार, सोलापूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी एकूण ४९ हजार ७२२ मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये ३७ हजार ७३० पुरुष आणि ११ हजार ९९२ महिला मतदारांचा समावेश आहे.

पदवीधर मतदारसंघासाठी माळशिरस येथे सर्वाधिक ६ हजार ५१७ मतदार आहेत, तर सोलापूर शहर मध्य येथे सर्वात कमी २ हजार २५६ मतदार नोंदणीकृत आहेत. मतदारसंघातील मतदारसंख्येनुसार मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. शिक्षक मतदारसंघात १५ हजार ३०३ मतदार



शिक्षक मतदारसंघासाठी जिल्ह्यात एकूण १५ हजार ३०३ मतदार आहेत. यामध्ये १० हजार ९२७ पुरुष आणि ४ हजार ३७६ महिला मतदारांचा समावेश आहे. पदवीधर आणि शिक्षक अशा दोन्ही मतदारसंघांतील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संबंधित मतदान केंद्रांवर आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

११ विधानसभा क्षेत्रांमध्ये १९३ मतदान केंद्रे सोलापूर जिल्ह्यातील विविध विधानसभा क्षेत्रांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी स्वतंत्र मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार करमाळा येथे पदवीधर मतदारसंघासाठी १० आणि शिक्षक मतदारसंघासाठी ८ मतदान केंद्रे; माढा येथे अनुक्रमे १३ आणि ९; बार्शी येथे ११ आणि ९; मोहोळ येथे ११ आणि ७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

सोलापूर शहर उत्तर येथे पदवीधरांसाठी ८ आणि शिक्षकांसाठी २, तर सोलापूर शहर मध्य येथे अनुक्रमे ४ आणि १ मतदान केंद्र आहे. अक्कलकोट येथे १० आणि १०, दक्षिण सोलापूर येथे १० आणि ६, पंढरपूर येथे १५ आणि ९, सांगोला येथे १२ आणि ९, तर माळशिरस येथे १३ आणि ६ मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. या केंद्रांद्वारे जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

१,१६५ कर्मचारी नियुक्त; सहा भरारी पथकांद्वारे देखरेख

निवडणूक कामकाजासाठी पदवीधर मतदारसंघाकरिता ७०५, तर शिक्षक मतदारसंघाकरिता ४६० असे एकूण १ हजार १६५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि राखीव कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळ व्यवस्थापन, मतदान साहित्य, वाहतूक आणि संगणकीकरण या कामांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी भरारी पथकांमार्फत देखरेख ठेवण्यात येत आहे.

सोलापूर विभागासाठी २, कुर्डूवाडी विभागासाठी २ आणि पंढरपूर विभागासाठी २ अशी एकूण ६ भरारी पथके कार्यरत आहेत. ही पथके आचारसंहितेच्या अनुषंगाने लक्ष ठेवून आवश्यक कार्यवाही करीत आहेत. ४६६ जंबो बॅलेट बॉक्सची व्यवस्था

मतदान प्रक्रियेसाठी ३८६ जंबो बॅलेट बॉक्स आणि ८० अतिरिक्त बॅलेट बॉक्स, असे एकूण ४६६ जंबो बॅलेट बॉक्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मतदान साहित्याच्या सुरक्षित साठवणुकीसाठी सोलापूर येथील रामवाडीमधील शासकीय अन्नधान्य गोदामात जिल्हास्तरीय स्ट्राँग रूम निश्चित करण्यात आली आहे.

मतदान साहित्याची उपलब्धता, त्याची सुरक्षित हाताळणी आणि निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचे नियोजन यावर प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधांची व्यवस्था

मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक मूलभूत व्यवस्था करण्यात येत आहे. यामध्ये रॅम्प, पिण्याचे पाणी, वीज, फर्निचर, शौचालय, वैद्यकीय संच आणि मदत कक्षाचा समावेश आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध राहतील, याची दक्षता संबंधित यंत्रणांकडून घेतली जात आहे.

२३ ऑक्टोबरला मतदान; २७ ऑक्टोबरला मतमोजणी पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी सोमवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत असून, मतदान प्रक्रिया शांततेत आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक तयारी करण्यात आली आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण

नवी दिल्ली, दि. २१ : नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य पर्वाचा शुभारंभ ठरणाऱ्या ३१ ऑक्टोबरच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अन्य मंत्री आणि अधिकारी - पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

राष्ट्रपती भवन येथे झालेल्या या भेटीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना येत्या ३१ ऑक्टोबर रोजी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे आयोजित ध्वजारोहण सोहळ्याचे औपचारिक निमंत्रण दिले. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेपासून आदिवासी उद्योजकता, वस्त्रकला, कृषिसमृद्धी आणि खाद्यसंस्कृतीपर्यंतच्या वैविध्यपूर्ण वारशाची ओळख करून देणारा विशेष भेटवस्तू संचही त्यांना प्रदान केला. राष्ट्रपती यांना ध्वजारोहणाच्याच दिवशी होणाऱ्या गोदा आरती, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन, कुंभमेळा गीताचे लोकार्पण, कुंभमेळ्यावर आधारित कॉफिटेबल बुक आणि कुंभमेळा टपाल तिकिटाच्या अनावरणासाठीदेखील आमंत्रित करण्यात आले.

यावेळी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन व कुंभमेळा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, त्र्यंबकेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय सहआयुक्त न्यायमूर्ती विवेक सोनवणे, नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, त्र्यंबकेश्वर पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज थेटे, रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचे नरसिंहकृपा दास, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह आदी यावेळी उपस्थित होते.

# सतेज पाटलांनी निवडणुकीपूर्वीच केली होती घोषणा

अत्यंत चुरशीने झालेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसप्रणित आमदार सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने बाजी मारली. गोकुळमध्ये २५ पैकी १३ जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व प्राप्त केलं. महायुतीने प्रचंड ताकद झोकून दिली असताना सुद्धा पाटील यांनी एकहाती झुंज देत गोकुळमध्ये सत्तांतर घडवून आणलं.



चेअरमनपदाची निवडणूक २९ ऑक्टोबर रोजी होणार दरम्यान, सतेज पाटील यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यापूर्वीच शशिकांत पाटील चुयेकर यांच्या नावाची घोषणा गोकुळच्या चेअरमन पदासाठी केली होती. आता सत्ता आल्यानंतर तो शब्द पाळताना शशिकांत पाटील चुयेकर यांच्या नावावरती पाटील यांच्याकडून शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. दरम्यान गोकुळ दूध संघाच्या चेअरमनपदाची निवडणूक २९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. शशिकांत पाटील चुयेकर हे गोकुळचे संस्थापक चेअरमन स्वर्गीय आनंदराव पाटील चुयेकर यांचे चिरंजीव आहेत. गेल्यावेळी त्यांचं नाव निश्चित होऊन सुद्धा त्यांना चेअरमनपद मिळालं नव्हतं. त्यावेळी अरुण डोंगळे यांनी केलेल्या विश्वासघातकी राजकारणामुळे शशिकांत पाटील चुयेकर हे पदापासून दूर राहिले होते. निवडणुकीपूर्वीच केली होती घोषणा

त्यानंतर झालेल्या अभूतपूर्व राजकीय घडामोडीमध्ये नविद मुश्रीफ यांना चेअरमनपद देण्यात आलं होतं. हाच घटनाक्रम लक्षात ठेवून पाटील यांनी गोकुळच्या निवडणुकीमध्ये उतरताना शशिकांत पाटील चुयेकर यांच्या चेअरमनपद देण्याची घोषणा केली होती. सत्ता आल्यानंतर आम्हीच त्यांचा सन्मान राखून जो गुलाल हार त्यांनी अध्यक्षपदासाठी आणला होता, मांडव सुद्धा घातला होता. तोच गुलाल आता सत्ता आणून पुन्हा उधळायचा असल्याचं पाटील यांनी निवडणुकीचं रणशिंग फुंकताना म्हटलं होतं. त्यामुळे आता शशिकांत पाटील यांचं चेअरमनपदाचं स्वप्न पूर्ण होणार आहे.

# दुष्काळग्रस्त भागातील बालकांच्या पोषणाकडे विशेष लक्ष

मुंबई, दि. २१ : राज्यातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी तसेच गर्भवती आणि स्तनदा मातांना पोषण व आरोग्यविषयक सुविधा अखंडितपणे उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. अंगणवाड्यांना दररोज भेट देऊन कामाचा आढावा घ्यावा आणि दुष्काळी परिस्थितीत अंगणवाड्या सुरू ठेवण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या या बैठकीत त्यांनी विविध जिल्ह्यांतील समस्या जाणून घेतल्या. यावेळी विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, सहसचिव वि. रा. ठाकूर, सहआयुक्त संगीता लोंढे, अवर सचिव सरदार उपस्थित होते. आयुक्त माधवी सरदेशमुख यांनी विभागाच्या कामकाजाचे सादरीकरण केले.

कुपोषण रोखण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे निर्देश दुष्काळी परिस्थितीत बालकांमध्ये मध्यम तीव्र आणि तीव्र कुपोषण वाढू नये, यासाठी सर्व संबंधितांनी जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडणे आवश्यक आहे. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वयाने काम करावे, असे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांनी सांगितले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, दुष्काळ जाहीर झालेल्या जिल्ह्यांनी कामाचा वारंवार आढावा घ्यावा. ज्या भागांमध्ये पाणीटंचाई अधिक आहे, तेथे पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधावा. पाणीपुरवठा आणि आरोग्य विभागाच्या मदतीने अंगणवाड्यांपर्यंत आवश्यक सुविधा पोहोचवाव्यात. स्थलांतरित कामगारांच्या कुटुंबांची माहिती घेऊन त्यांच्या बालकांचे शिक्षण आणि पोषणसेवा सुरू राहतील, यासाठी पालकांना मार्गदर्शन करावे. तसेच गर्भवती मातांना अखंडित सेवा देऊन त्यांच्या आणि बालकांच्या आरोग्याची नियमित नोंद ठेवावी. सहकारी व खासगी साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांच्या मूळ गावांची, कुटुंबप्रमुखांची आणि लाभार्थ्यांची माहिती तसेच संपर्क अधिकाऱ्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक जिल्हा कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

This daily evening news paper ,owner,publisher ,printer, Editor,Prasad Sanjay Pawar, printed at RAJASWA printing press , 53/A Budhawar Peth ,Laxman Maharaj Nagar ,SOLAPUR and published here It is not possible that editors of this article will agree ( solapur jurisdiction) Mo-7387386385

# तरुणाला मारहाण करणाऱ्या पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी हिंगोली रेल्वे स्थानकावर दोन तास रेल्वे अडवली.

प्रतिनिधी : हिंगोली ----पल्लवी मुदगल नागपूर येथून हिंगोलीकडे निघालेल्या तरुणाला आरक्षीत डब्यात बसल्याच्या कारणावरून रेल्वे पोलिसांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणात दोषी पोलिसावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी आबंडेकर अनुयायी यांनी गुरुवारी ता. २२ पहाटे भगत कि कोठी ते काचीगुडा हि रेल्वे हिंगोली रेल्वे स्थानकावर अडीच तास रेल्वे रोखून धरली. रेल्वे पोलिस व स्थानिक पोलिसांच्या मध्यस्थीनंतर तक्रार घेण्यात आली. त्यानंतर सकाळी पावने आठ वाजता रेल्वे मार्गस्थ झाली. हिंगोली जिल्हयातील मोठ्या संख्येने आंबेडकर अनुयायी नागपुर येथे दिक्षाभुमी येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. त्या ठिकाणी कार्यक्रम आटोपून परतीच्या मार्गावर होते. यावेळी भगत कि कोठी ते काचीगुडा या रेल्वेमध्ये काही अनुयायी बसले होते. वाशीम येथून हि रेल्वे हिंगोलीकडे निघाल्याने सुरज वाव्हळे व सागर वाव्हळे हे दोघे बोगी क्रमांक एक या आरक्षीत डब्यात बसले. यावेळी रेल्वे पोलिसचे कर्मचारी त्या डब्यात आले त्यांनी सुरज वाव्हळे यांना शिवीगाळ करून मारहाण सुरु केली. मात्र रेल्वे निघाल्यामुळे धावत डब्यात बसलो असे सांगत असतांनाही पोलिसांनी त्यांचे काहीही ऐकून घेतले नाही. दरम्यान, सदर प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर इतर डब्यातील आंबेडकर आनुयायी यांनी आरक्षीत बोगीकडे धाव घेतली. यावेळी त्यांनी पोलिसांची समजून घालण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी ऐकले नाही.त्यानंतर सुरज यांचे नातेवाईक गौतम सरवदे (रा. आंबाजोगाई) यांनी हेल्पलाईनशी संपर्क साधून मदत मागितली. त्यांना हिंगोली रेल्वे स्थानकावर मदत दिली मिळेत असे सांगण्यात आले. दरम्यान, सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास रेल्वे हिंगोली रेल्वेस्थानकावर आल्यानंतर त्यांचा संताप अनावर झाला. यावेळी त्यांनी रेल्वे रोखून धरली. जोपर्यंत दोषी रेल्वे पोलिस कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल होत नाही तोपर्यंत रेल्वे जाऊ देणार नाही अशी



भुमीका त्यांनी घेतली. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पोलिस अधिक्षक श्रेणिक लोढा, उपाधिक्षक देशमुख, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकुर, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संजय मर्के, जमादार अशोक धामणे, सुनील अंभोरे, संजय तोडेवाले, रेल्वे पोलिस कर्मचारी अंकुश बांगर, इंगोले, यांच्यासह पथकाने रेल्वे स्थानकावर धाव घेतली. यावेळी पोलिसांनी संवाद साधून दोषींवर कारवाईचे आश्वासन दिले. त्यानंतर गौतम सरवदे यांची तक्रारी घेण्यात आली. त्यानंतर अडीच तासानंतर पावने आठ वाजण्याच्या सुमारास रेल्वे नांदेडकडे मार्गस्थ झाली.

## गोकुळच्या महायुतीचे पॅनल प्रमुख हसन मुश्रीफांचाच नेत्यांवर , तिकडं सतेज पाटलांनी सुद्धा चिमटा काढला

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीमध्ये माझ्या मुलाचा पराभव हे ठरवून केलेलं षड्यंत्र असल्याची टीका मंत्री हसन मुश्रीफ यांनी केली. मुश्रीफ यांचे चिरंजीव नवीन मुश्रीफ ओबीसी गटामधून निवडणुकीच्या रिंगणात होते. मात्र, त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. गोकुळसाठी महायुतीचे पॅनल प्रमुख हसन मुश्रीफ होते, त्यामुळे आपल्या मुलाचा



झालेला पराभव मुश्रीफ यांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. त्यामुळेच त्यांनी आपल्या मुलाचा पराभव षडयंत्र रचून केल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे आम्ही त्यांचा पराभव कसा करू? यावेळी बोलताना त्यांचा निशाणा महायुतीमधीलच नेत्यांवर पाहायला मिळाला. जिल्ह्यातील बारापैकी आठ तालुक्यांमध्ये नविद मुश्रीफ यांना विरोधी उमेदवारांपेक्षा कमी मत मिळाली आहेत, त्यामुळे हसन मुश्रीफ यांनी संताप व्यक्त केला. यावर बोलताना सतेज पाटील यांनी हसन मुश्रीफ यांचा चिमटा काढला. महायुतीकडे ४ हजार ४०० मते होती, त्यामुळे आम्ही त्यांचा पराभव कसा करू? आमच्या उमेदवारासाठी जे करावे लागत होतं ते आम्ही केलं, आता मुश्रीफ साहेबांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत काय करायचं ते ठरवावे असेही वक्तव्य सतेज पाटील यांनी केले. फोडाफोडीचे कुठलेही राजकारण गोकुळ मध्ये होणार नाही दरम्यान, गोकुळचा निकाल अतिशय अनपेक्षित आणि धक्कादायक असून मतदारांपर्यंत पोहचणं, मतदारांना समजावून सांगणं यामध्ये आम्ही कमी पडलो, महायुतीच्या काही गोष्टी लोकांना पटल्या नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात क्रॉस व्होटिंग झालं असल्याची कबुली खासदार धनंजय महाडिक यांनी दिली आहे. शपथा घेणं नवीन नाही, आपण हिंदू लोक निवडणूक आली किंवा परीक्षा आली की मंदिरात जातो, नमस्कार करतो फोडाफोडीचे कुठलेही राजकारण गोकुळ मध्ये होणार नाही, आमचे १२ लोक निवडून आले आहेत, आम्ही विरोधात बसणार आहोत. भाजपबद्दल अफवा आहेत, अशी कोणतीही बैठक झाली नाही, असे त्यांनी सांगितले.

## सांगली जिल्हा बँकेतील समझोता एक्स्प्रेसचा पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीवर होणार का? विश्वजीत कदम नेमकं काय म्हणाले?

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी सर्वच पक्षांच्या नेत्यांनी प्रयत्न



केले. दुष्काळी परिस्थितीत विनाकारण टीका-टिप्पणी आणि संघर्ष नको, अशी मतदारांची भूमिका होती. त्यामुळे सर्वांनी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न केल्याचे डॉ. विश्वजीत कदम यांनी म्हटलं आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर आमदार डॉ. विश्वजीत कदम यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. विश्वजित कदम म्हणाले, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत महायुतीसोबत झालेल्या समझोत्याचा आगामी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीवर कोणताही परिणाम होणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा बँकेतील मतदारांना संघर्ष नको होता आमदार विश्वजीत कदम म्हणाले, की कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांनी ज्या पद्धतीने महायुतीच्या विरोधात निवडणूक लढवली, त्याचप्रमाणे सांगली जिल्हा बँकेची निवडणूक महाविकास आघाडी आणि समविचारी पक्षांच्या माध्यमातून लढवण्याची आमची तयारी होती. मात्र, जिल्हा बँकेतील मतदारांना संघर्ष नको होता. त्यातच जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने विनाकारण राजकीय टीका-टिप्पणी होऊ नये, अशी सर्वांची भावना होती. जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांमध्येही निवडणूक लागू नये, यासाठी सर्वच पक्षांच्या नेत्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले. मात्र, दुर्दैवाने काही तालुक्यांमध्ये निवडणूक लागली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी सर्वांनी सामंजस्याची भूमिका घेतल्याचे कदम यांनी नमूद केले.

## तुळजापूर गोळीबार प्रकरणातील आरोपींना जामीन मंजूर!

ड. विराज जगदाळे यांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाचा निर्णय; कणे स्टॉप परिसरातील घटनेने शहरात उडाली होती खळबळ तुळजापूर । प्रतिनिधी तुळजापूर शहरातील चर्चेचा विषय ठरलेल्या धाराशिव-तुळजापूर रस्त्यावरील पार्किंग समोर कणे स्टॉप परिसरात घडलेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली होती. या प्रकरणात पोलिसांनी गु.र. नं. ५१२/२०२६ भारतीय शस्त्र कायद्यानुसार गुन्हा दाखल करून तपासाची कारवाई केली होती. या प्रकरणातील दोन मुख्य अटक आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे तुळजापूर शहरासह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. नेमके प्रकरण काय? ऐन नवरात्रीत तुळजापूर शहरातील गजबजलेल्या कणे स्टॉप परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास दोन गटांमधील वादातून हाणामारी आणि गोळीबार झाल्याची घटना समोर आली होती. या घटनेनंतर संबंधित परिसरात पोलिसांनी बंदोबस्त वाढविला होता. शहरातील गजबजलेल्या ठिकाणी गोळीबाराचा प्रकार झाल्याने घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपास सुरू केला होता. या घटनेशी संबंधित तपासादरम्यान पोलिसांनी अग्नीशस्त्र (पिस्तूल), पिवळ्या रंगाची रिकामी पुंगळी तसेच एक इनोव्हा कार जप्त केली होती. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई केली होती. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या दोन मुख्य आरोपींच्या वतीने न्यायालयात ड. विराज विलासराव जगदाळे यांनी वकीलपत्र घेत जामीन अर्ज दाखल केला होता. आरोपींच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद आणि प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांचा विचार करून न्यायालयाने दोन्ही आरोपींना जामीन मंजूर केला



आहे. या प्रकरणात ज्येष्ठ वकील ड. संजय पवार यांचे मार्गदर्शन व ड.ओंकार मस्के यांचे सहकार्य लाभल्याचे सांगण्यात आले.

## सैनिक स्कूलच्या गरगडे व डुम्मलवाड यांची शालेय मॉर्डन राज्यस्तरीय पॅटथलॉन क्रीडा स्पर्धेसाठी निवड !



तुळजापूर प्रतिनिधी तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सुमित गरगडे व हर्षद डुम्मलवाड या दोन विद्यार्थ्यांची सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पॅटथलॉन क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दिनांक - २१ऑक्टोबर २०२६ रोजी लातूर या ठिकाणी संपन्न झालेल्या विभागस्तरीय शालेय मॉर्डन पॅटथलॉन क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत श्री. तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १७ वर्ष वयोगटात १) सुमित गरगडे- प्रथम, तसेच १९ वर्ष वयोगटात १) हर्षद डुम्मलवाड- द्वितीय , क्रमांक पटकला या दोन्ही विद्यार्थ्यांचे सातारा येथे होणा-या राज्यस्तरीय मॉर्डन पॅटथलॉन क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे . या सर्व विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख श्री.राजेश बिलकुले सर क्रीडाशिक्षक श्री ज्ञानेश्वर माने सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैजिनाथ घोडके सर , पर्यवेक्षक डॉ.सुभाष पेटकर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## मेट्रो ग्रॅण्ड डी विंग मध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

( प्रतिनिधी कल्याण ) कल्याण पूर्वेतील नेतिवली येथील मेट्रो ग्रॅण्ड डी विंग मध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून नवनाथ रणखांबे आणि ज्येष्ठ प्रसिद्ध बौद्ध साहित्यिक डी. एल. कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते नवनाथ रणखांबे यांनी आपल्या व्याख्यानात, भारत बौद्धमय करण्यासाठी विविध जाती-धर्मांतील लोकांना मैत्रीच्या नात्याने जोडून त्यांच्या मनामनांत धम्म रुजविला पाहिजे. आपल्या नव्या पिढीच्या श्वासात आणि घासात भीम आणि बुद्ध पेरला पाहिजे, असे मत व्यक्त केले. तर प्रसिद्ध बौद्ध साहित्यिक डी. एल. कांबळे यांनी आपल्या व्याख्यानात भारतीय संस्कृतीतील बौद्ध परंपरेचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, या देशाची मूळ संस्कृती बौद्ध आहे. गौतम बुद्धांपूर्वी सत्तावीस बुद्ध होऊन गेले असून, गौतम बुद्ध हे अठ्ठाविसावे बुद्ध आहेत. या बुद्धांचा इतिहास विविध कथांमधून जतन झाला आहे. त्यामुळे देशातील बौद्ध संस्कृतीची परंपरा समजून घेणे महत्त्वाचे आहे. धम्मपद हा ग्रंथ माणसाला जीवन जगण्याची कला शिकवतो, तर जातक कथा माणसाला नियोजनाचे महत्त्व समजावून सांगतात. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी शिला भगत, सुलभा मोटघरे, निरोपा गजगे, आशा खराटे, दर्शना गायकवाड आणि आनंदा अलोने यांनी स्वागत गीत गायन केले. आशा रणखांबे यांनी सुमधुर धम्मगीतांचे



गायन करून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. प्रमुख मान्यवरांचे मार्गदर्शन झाल्यानंतर उपस्थित रहिवाशांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. मेट्रो ग्रॅण्ड डी विंग मध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन रहिवाशांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महानंदा अहिरे, समाधान खराटे, निनाद गायकवाड, भाऊसाहेब मोटघरे, प्रतीक टेभुरणे, संजय ओंकारेश्वर, अनिल बसवंत, सुनील मेश्राम, शिवराम सोनावणे आणि धिरेंद्र मानवटकर यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा कामेश जाधव यांनी

सायंदैनिक राजस्व



# लातूरमध्ये डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ पदवीधर संवाद मेळावा

लातूर प्रतिनिधी : मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांच्या प्रचारार्थ लातूर येथे पदवीधर संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात पदवीधर मतदारांशी संवाद साधत शिक्षण,



रोजगार, बेरोजगारी आणि पदवीधरांच्या न्याय्य हक्कांसह विविध प्रश्नांवर मार्गदर्शन करण्यात आले. पदवीधरांच्या प्रश्नांची जाण असलेले, अभ्यासू आणि सुसंस्कृत नेतृत्व म्हणून डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्याकडे पाहिले जात असून, त्यांना प्रथम पसंतीचे मत देऊन प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन आ. रोहित दादा पवार यांनी केले. या संवाद मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या पदवीधर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, प्रदेश उपाध्यक्ष संभाजी पाटील, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, राजा मणियार, डॉ. बापूसाहेब पाटील, भरत सूर्यवंशी, सोमेश्वर कदम, ड. उदय गवारे, माधव गंगापूरे, संजय शेटे, प्रशांत घार, रघुनाथ कुचेकर, डॉ. रमेश बगडे, रशीद शेख, निशांत वाघमारे, प्रवीण साळुंखे, बालाजी कदम, गजानन सताळकर, शंकर मुक्कावार, कल्पनाताई फलकांडे, ड. इरफान शेख, दीपक गावळी, सचिन शिवशट्टे, शारूख पठाण, नरेंद्र पाटील, चंद्रशेखर कत्ते आणि मनोज कातळे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, पदवीधर मतदार आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदवीधरांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्यासमोर उभ्या राहणाऱ्या रोजगाराच्या समस्या, वाढती बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांचे प्रश्न आणि सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देण्याची गरज, या महत्त्वाच्या विषयांवर पदवीधरांमध्ये जागृती निर्माण करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. पदवीधर मतदारसंघ हा केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून, उच्चशिक्षित तरुणांच्या अपेक्षा, शिक्षकांचे प्रश्न आणि सुशिक्षित समाजाच्या हक्कांना विधिमंडळात प्रभावीपणे मांडण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. त्यामुळे पदवीधरांचे प्रश्न समजून घेणारे आणि त्यांच्या समस्यांसाठी सातत्याने प्रयत्न करणारे नेतृत्व निवडणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन व विजयादशमीनिमित्त आयोजित धम्म रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद

धाराशिव दि. २१ (प्रतिनिधी) - ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन व सम्राट अशोक विजयादशमी दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धम्म रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तर सजविलेल्या



रथातून तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांची लेझीमच्या तालात भव्य मिरवणूक काढण्यात आली. धाराशिव शहरातील भीम नगरमधील क्रांती मोर्चा चौकातील क्रांती स्तंभ येथे सजविलेल्या रथामध्ये तथागत गौतम बुद्ध व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, बांधकाम सभापती सभापती अभिजीत काकडे, पाणी पुरवठा सभापती विलास लोंढे, नगरसेवक राहुल काकडे, अक्षय ढोबळे, अभिजीत काकडे, अक्षय जोगदंड, पृथ्वीराज दंडनाईक, दाजीअप्पा पवार, अभिजीत पतंगे, सदानंद अकोसकर, पत्रकार धनंजय पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टीचे नगर परिषद गटनेते खलिफा कुरेशी, नगरसेवक अयाज शेख, अफरोज पिरजादे, भाजपचे प्रवक्ते ड नितीन भोसले, आयोजक नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे माया कपनी सामाजिक संघटनेचे बाळासाहेब बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. ही धम्म रॅली क्रांती चौक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, त्रिशरण चौक, पोस्ट ऑफिस, संत गाडगेबाबा महाराज चौक मार्गे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा येथे वाजत गाजत आणि लेझीमच्या ठेक्यात दाखल झाले. यावेळी ढोल-ताशांच्या गजरात आणि बाबासाहेबानं दिलं.... कुंकू लावीलं रमानं....माझी म्हणू का..... आदींसह विविध भीम गीतांच्या तालावर सुरेख व तेवढ्याच जोशपूर्ण आणि दमदारपणे सादरीकरण करुन उपस्थितांची वाहवा मिळवली. या मुलामुलींच्या लेझीमचे उत्कृष्ट सादरीकरणच या रॅलीचे प्रमुख आकर्षण ठरले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादनाने या रॅलीची सांगता करण्यात आली. रॅली दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुमार दराडे यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवला होता. याबरोबरच मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी देखील सहकार्य केले. अतिशय शांततामय धम्म रॅलीमध्ये बौद्ध उपासक, उपासिका, महिला, युवक-युवती व भीम अनुयायी मोठ्या संख्येने सामील झाले होते.

# पंढरीत वारकरी महा अधिवेशन !

प्रतिनिधी :बाळासाहेब आसबे

महाराष्ट्राची दक्षिण काशी आणि वारकऱ्यांचे माहेर तीर्थक्षेत्र पंढरीत वारकरी संप्रदाय पाईक संघ यांच्या वतीने अश्विन शुद्ध पौर्णिमा, सोमवार दि.२६ ऑक्टोबर २०२६ रोजी पंढरीतील आरती मंडप सभागृह येथे महा अधिवेशन होणार आहे .

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज, श्री. संत नामदेव महाराज श्री. संत चोखोबा महाराज, श्री. संत जनाबाई, श्री. संत सावता माळी, श्री संत एकनाथ महाराज, श्री संत तुकाराम महाराज या सर्व संत मंडळींकडून उत्कट भक्ती, निर्मळ अंतकरण आणि शुद्ध आचरणाची त्रिसूत्री घेऊन भेदाभेद अमंगळ !म्हणत समतेचा संदेश देणारा हा वारकरी नामस्मरण, भजन, कीर्तन हरिपाठ द्वारा हरिभक्ती करणारा हा वारकरी अशा या वारकऱ्याला किंवा वारकऱ्यांचा बनलेल्या वारकरी संप्रदायाला रोजच्या जीवनात विविध गोष्टींना तोंड द्यावे लागते. तर कधी कधी काही समस्या निर्माण होत असतात .यासाठी वारकरी, दिंडी करी , फडकरीही मंडळीआपापल्या परीने चर्चा करून मार्ग अवलंबत असतात. पण काही काही समस्या अशाही असू शकतात, की त्याकरता महाराष्ट्र ,कर्नाटकसह भारतभर पसरलेल्या अशा विशाल वारकरी व्यक्ती व संप्रदायाच्या समस्या आणि अडीअडचणी एखाद्या मंचावर घेऊन त्या सोडण्याचा प्रयत्न झाला तर --- अशा विचारातूनच वारकरी महा अधिवेशनाची निर्मिती झाली असावी. आणि या वारकरी महा अधिवेशनामध्ये अगदी विधिमंडळ अधिवेशनाच्या धरतीवरच उपस्थित वारकरी , वारकरी संप्रदायातील सर्व संघटना, वारकरी संप्रदाय यांच्यातील व्यक्तिगत अथवा सामाजिक प्रश्न मांडण्याची एक समान संधी यानिमित्ताने मिळणार आहे .यातून त्यांचे सार्वत्रिक समाधान ,त्यांची उकल करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न हा या सार्वजनिक व्यासपीठावर होणार आहे.

अशा या वारकरी महा अधिवेशनाचे उद्घाटन आश्विन शुद्ध पौर्णिमा शके १९४८ सोमवार दिनांक २६/ १०/ २० २६ रोजी सकाळी आठ वाजता प्रतिमापूजन व दीप प्रज्वलनाणे होणार आहे. यानंतर





अभंग गायन, प्रास्ताविक, आशीर्वचन, बीज भाषण होणारा आहे यावेळी वारकरी संप्रदायातील जेष्ठ सेवानिष्ठ वारकऱ्यांना जीवन गौरव सन्मानपत्र वितरित होणार आहे.

# पालकांनो लक्ष द्या..गरज नसतानाही मुलांना प्रोटीन सप्लिमेंट्स दिलं जातंय? तज्ज्ञांनी दिली महत्त्वाची माहिती...

आजकाल मुलांच्या आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढवण्याकडे अनेक पालकांचा कल दिसतो. मुलांची उंची वाढावी, शरीराची चांगली वाढ व्हावी आणि त्यांना पुरेशी ताकद मिळावी, यासाठी दूध, अंडी, पनीर यांसोबत प्रोटीन पावडर आणि प्रथिनयुक्त






पदार्थही दिले जातात. मात्र, मुलांना खरंच अतिरिक्त प्रथिनांची गरज असते का, की घरच्या संतुलित आहारातूनच त्यांची गरज पूर्ण होऊ शकते? हे समजून घेणे गरजेचे आहे. पुणे येथील मदरहुड हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ आणि पोषणतज्ज्ञ, डॉ. इंशारा मुस्तफा यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

मुलांना पुरेशी प्रथिने मिळत आहेत का? सुपरमार्केटमध्ये खरेदीसाठी गेल्यावर किंवा सोशल मीडियावर नजर टाकल्यावर प्रथिनयुक्त पदार्थांची जाहिरात मोठ्या प्रमाणात दिसते. प्रोटीन बार, शेक, पावडर, कुकीज आणि नाश्त्याचे धान्य अशा अनेक पदार्थांना आरोग्यदायी पर्याय म्हणून निवडले जाते. पालकांनाही आपल्या मुलांना सर्वोत्तम आहार द्यायचा असतो. प्रथिने मुलांच्या वाढीसाठी, स्नायूंच्या विकासासाठी तसेच शारीरिक बळकटीसाठी आवश्यक असल्याचे ऐकल्यानंतर त्यांच्या मनात मुलांना पुरेशी प्रथिने मिळत आहेत का, असा प्रश्न निर्माण होतो.

मुलांच्या प्रत्यक्ष पोषणविषयक गरजा लक्षात घेणे महत्त्वाचे...

याबाबत डॉ. मुस्तफा सांगतात, बहुतांश निरोगी मुलांना संतुलित आणि विविध पदार्थांचा समावेश असलेल्या आहारातून पुरेशी प्रथिने मिळू शकतात. मुलांना गरजेपेक्षा अधिक प्रथिने देणे आवश्यक नाही. विशेषतः मूत्रपिंडाशी संबंधित आजार असलेल्या मुलांमध्ये अतिरिक्त प्रथिनांमुळे मूत्रपिंडांवरील भार वाढू शकतो. त्यामुळे बाजारातील जाहिराती किंवा सध्याचे आहारविषयक ट्रेंड पाहून निर्णय घेण्याऐवजी मुलांच्या प्रत्यक्ष पोषणविषयक गरजा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

मुलांच्या वाढीसाठी प्रथिनांची गरज डॉ. मुस्तफा सांगतात, शरीरातील पेशी आणि ऊतींची निर्मिती व दुरुस्तीसाठी आहारातील प्रथिने महत्त्वाची भूमिका बजावतात. मुलांची शारीरिक वाढ, स्नायूंचा विकास, हार्मोन्सची निर्मिती आणि रोगप्रतिकारक शक्तीचे योग्य कार्य यासाठीही प्रथिने आवश्यक असतात. मात्र, प्रत्येक मुलाची प्रथिनांची गरज सारखी नसते. मुलाचे वय, शरीराचे वजन, वाढीचा वेग आणि शारीरिक हालचालींचे प्रमाण यानुसार त्याची प्रथिनांची गरज ठरते. त्यामुळे सर्व मुलांना सारख्याच प्रमाणात प्रथिने देणे योग्य ठरत नाही.

मुलांना दररोज किती प्रथिनांची गरज असते? खउचठ-छखछ २०२० अभ्यासानुसार सादर केलेल्या अहवालानुसार , विविध वयोगटांतील मुलांची दररोजची प्रथिनांची गरज साधारणपणे पुढीलप्रमाणे असते.

✻ १ ते ३ वर्षे: दररोज सुमारे १२.५ ग्रॅम ४ ते ६ वर्षे: दररोज सुमारे १६ ग्रॅम ७ ते ९ वर्षे: दररोज सुमारे २३ ग्रॅम १० ते १२ वर्षे: दररोज सुमारे ३२ ते ३३ ग्रॅम किशोरवयीन मुले: वाढीच्या वेगानुसार प्रथिनांची गरज वाढते. मुलगा किंवा मुलगी, वय आणि शारीरिक विकास यानुसार हे प्रमाण बदलते.

घरातील नेहमीच्या आहारातूनही प्रथिनांची गरज पूर्ण करता येते - डॉक्टर डॉ. मुस्तफा सांगतात, मुलांच्या आहारात प्रामुख्याने तांदूळ, गहू यांसारख्या धान्यांचा समावेश असेल आणि प्रथिनांचे इतर स्रोत मर्यादित असतील, तर आहारातील प्रथिनांचे प्रमाण आणि गुणवत्ता याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. अशा आहारात शरीराला आवश्यक अमिनो सिड्स पुरेशा प्रमाणात मिळण्यासाठी धान्ये, कडधान्ये आणि दूध यांचा योग्य समतोल राखणे उपयुक्त ठरते. मुलांच्या वजनाच्या प्रत्येक किलोग्रॅममागे सुमारे एक ग्रॅम प्रथिनांचे गरज असते. धान्ये, कडधान्ये आणि दूध यांचे साधारण ३:१:२.५ असे प्रमाणही प्रथिनांची गुणवत्ता सुधारण्यासाठी सुचवले आहे. मुलांना पुरेशी प्रथिने मिळवून देण्यासाठी महागडे प्रोटीन पावडर किंवा खास प्रथिनयुक्त म्हणून विकले जाणारे पदार्थ खरेदी करणे गरजेचे नाही. घरातील नेहमीच्या आहारातूनही प्रथिनांची गरज पूर्ण करता येते.

डाळी, कडधान्ये, दूध, दही, पनीर, अंडी, मासे, चिकन, सोयाबीन, विविध कडधान्यांपासून तयार केलेले पदार्थ, सुका मेवा आणि बिया हे प्रथिनांचे चांगले स्रोत आहेत. मुलांच्या आवडीनुसार आणि वयानुसार या पदार्थांचा संतुलित आहारात समावेश करता येतो. प्रत्येक जेवणात किती प्रथिने आहेत, याचाच विचार केला जाऊ लागतो तेव्हा समस्या निर्माण होऊ शकते. घरातील नेहमीच्या जेवणातूनही मुलांना अनेक पदार्थांद्वारे प्रथिने मिळत असतात. त्यामुळे मूल खेळते, धावते, अंगाने बारीक आहे किंवा त्याचे स्नायू पुरेसे विकसित झालेले नाहीत, अशा कारणांमुळे त्याला अतिरिक्त प्रथिने किंवा पूरक आहाराची देण्याची गरज असेलच असे नाही.

पालकांनो.. अशी घ्या काळजी... मुलांच्या खाण्यापिण्याबाबत सतत प्रथिनांचा आग्रह धरल्यास त्यांच्या मनात अन्नाविषयी आणि स्वतःच्या शरीराविषयी चुकीच्या कल्पना निर्माण होऊ शकतात. लहानपणापासूनच काही पदार्थ केवळ प्रथिनांनी समृद्ध असल्यामुळे चांगले आणि इतर पदार्थ कमी महत्त्वाचे आहेत, अशी भावना निर्माण होणे टाळले पाहिजे. मुलांच्या वाढीसाठी केवळ प्रथिनेच नव्हे, तर कर्बोदके, आरोग्यदायी स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, खनिजे आणि तंतुमय पदार्थही आवश्यक असतात. संतुलित आहाराऐवजी केवळ प्रथिनयुक्त पदार्थांवर भर दिल्यास इतर महत्त्वाच्या पोषक घटकांची कमतरता निर्माण होऊ शकते. मुलांचे शरीर अजून विकसित होत असल्याने त्यांच्या आहाराच्या गरजा प्रौढांच्या व्यायामविषयक सवयी किंवा सोशल मीडियावरील शरीरयष्टीविषयक कल्पनांनुसार ठरवू नये. एकूण आहार आणि खाण्याच्या सवयींकडे लक्ष द्या

पालकांनी आपल्या मुलांच्या ताटातील प्रथिनांच्या प्रमाणापेक्षा, ते संतुलित आहाराचे सेवन करत आहे का, याकडे लक्ष द्यावे. मुलांच्या जेवणात धान्य किंवा इतर कर्बोदकयुक्त पदार्थ, प्रथिनांचे स्रोत, भाज्या, फळे आणि आरोग्यदायी स्निग्ध पदार्थ यांचा समावेश असावा. मुलांना सकस आणि विविध प्रकारचे पदार्थ खाण्याची सवय लावावी. एखादा पदार्थ केवळ प्रथिनांनी समृद्ध असल्यामुळेच तो चांगला आहे, अशी धारणा त्यांच्या मनात निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.मुलांच्या भुकेत होणारे बदलही सामान्य असतात. एखाद्या दिवशी मूल भरपूर जेवते, तर दुसऱ्या दिवशी त्यांची जेवणाची इच्छा देखील नसते. त्यामुळे एका वेळच्या जेवणावरून लगेच निष्कर्ष काढण्याऐवजी काही दिवसांतील एकूण आहार आणि खाण्याच्या सवयींकडे लक्ष देणे योग्य राहील. प्रोटीन पावडर प्रत्येक मुलासाठी आवश्यक आहे का?

विविध पदार्थांचा समावेश असलेला संतुलित आहार घेणाऱ्या बहुतांश निरोगी मुलांना नियमितपणे प्रोटीन पावडर देण्याची गरज नसते. मात्र, मुलाची वाढ योग्य प्रकारे होत नसेल, त्याचा आहार अत्यंत मर्यादित असेल, त्याला विशिष्ट पोषणविषयक गरज असेल किंवा काही वैद्यकीय समस्या असतील, तर पूरक आहाराचा विचार केला जाऊ शकतो. अशा वेळी बालरोग तज्ज्ञ किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. केवळ जाहिराती, सोशल मीडियावरील माहिती किंवा इतर मुलांच्या आहाराचे अनुकरण करून प्रोटीन पावडर देण्याचा निर्णय घेऊ नये. मुलांच्या योग्य वाढीसाठी केवळ अधिक प्रथिनयुक्त आहार देण्यापेक्षा त्यांच्या वयानुसार, गरजेनुसार आणि आवडीनुसार संतुलित आहार देणे अधिक गरजेचे आहे.

# जलाभिषेक आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल! अखेर रस्त्याचे काम थांबविण्याचे कंपनीला आदेश

धाराशिव : प्रतिनिधी धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेर-तुळजापूर-अक्कलकोट राज्य मार्गावरील केशेगाव ते तुळजापूर दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामासाठी होणाऱ्या पाणी उपशाचा मुद्दा अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. या प्रकरणी शेतकरी पुत्र तथा रुग्णसेवक मनोज जाधव यांनी दिलेले निवेदन आणि प्रस्तावित 'जलाभिषेक आंदोलना'च्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित रस्ते बांधकाम कंपनीला लेखी पत्र देऊन कामकाज 'सेफ स्टेज'मध्ये आणून तात्काळ थांबविण्याचे निर्देश दिले आहेत. विक्रम इन्फ्राटेक लिमिटेड, पुणे या कंपनीला सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता, धाराशिव यांनी लेखी पत्राद्वारे सदरील रस्त्याचे काम सुरक्षित टप्प्यावर आणून तात्काळ थांबविण्याबाबत कळविले आहे. त्यामुळे या प्रकरणात प्रशासनाने दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. २२ ऑक्टोबरच्या जलाभिषेक आंदोलनाला तात्पुरती स्थगिती धाराशिव जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती गंभीर असताना रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात पाणी वापरले जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत मनोज जाधव यांनी ३० सप्टेंबर २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन दिले होते. पाणी उपसा थांबविण्यासाठी सात दिवसांची मुदत देत कार्यवाही न झाल्यास २२ ऑक्टोबर रोजी कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर 'जलाभिषेक आंदोलन' करण्याचा अंतिम इशाराही देण्यात आला होता. या विषयाला स्थानिक पत्रकार बांधवांनी प्रिंट आणि डिजिटल माध्यमांतून प्रसिद्धी देत जनहिताचा प्रश्न ऐरणीवर आणला.

# धाराशिवमधील सफाईगार, शिपाई व माळी कर्मचाऱ्यांना २५ हजार वेतन द्या!

धाराशिव (प्रतिनिधी) धाराशिव जिल्ह्यातील समाजकल्याण विभागांतर्गत कार्यरत सफाईगार, शिपाई व माळी कर्मचाऱ्यांना किमान २५ हजार रुपये मासिक वेतन देण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आनंद भालेराव यांच्या नेतृत्वाखाली समाजकल्याण अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे आले. संबंधित कर्मचारी सन २०१३ पासून स्मार्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या माध्यमातून सेवा बजावत असून, सध्या मिळणारे सुमारे १२ हजार २०० रुपयांचे वेतन महागाईच्या तुलनेत अपुरे असल्याचे निवेदनात म्हटले आहे. कोरोना काळातील कर्मचाऱ्यांच्या सेवेची दखल घेऊन त्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणीही करण्यात आली. या निवेदनावर महासंघाचे अध्यक्ष आनंद भालेराव, उपाध्यक्ष नंदकुमार मानाळे, पुष्पकांत माळाळे, हनुमंत तौर यांच्यासह अर्चना कांबळे,जयश्री आचार्य, स्नेहलता बनसोडे,शिल्पा गोरे,मीरा भालेराव,सुवर्णा एडके,अमर बनसोडे,भीमा सुरवसे,अक्षय शिंगाडे,केदार झेंडे,पल्लवी गायकवाड,आरती,चव्हाण,लता झेंडे,सविता बनसोडे,भाग्यश्री शिरसागर,अनुसया गोरे,सुषमा बनसोडे,सारिका जानराव,जया बनसोडे,भाग्यश्री



वाठोरे,शुभांगी कांबळे,अरुणा बनसोडे,अर्चना हुंडे,शालिनी शिंगाडे,जया शिंगाडे,मिनाक्षी बनसोडे,संजयोती बनसोडे,छाया कांबळे,स्नेहलता कांबळे,राज्यश्री पेठे,अमोल साबळे,क्षमा बनसोडे यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बरडघाट स्मशानभूमीत सिमेंटच्या बैठक ओट्यांची व्यवस्था



चिमूर / जावेद पठाण : खडसंगी परिसरातील मौजा बरडघाट येथील स्मशानभूमीत नागरिकांच्या सोयीसाठी सिमेंटच्या बैठक ओट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या लोकहितकारी उपक्रमामुळे अंत्यसंस्कार व शोकसभेसाठी येणाऱ्या नागरिकांची होणारी गैरसोय दूर झाली असून, या सहकार्याबद्दल समस्त बरडघाटवासीयांच्या वतीने सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. स्मशानभूमीत मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे येथे येणाऱ्या नागरिकांना तासनतास उभे राहावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने येथे सिमेंटचे बैठक ओटे उभारण्यात आले आहेत. या सामाजिक व लोकहितकारी उपक्रमासाठी माननीय समीर राचरवर, ठाणेदार लबडे साहेब, चिमूर प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी राठोड , विनोद रणदिवे, अभय गौरकार, रोशन बन्सोड, अनिल मेश्राम, अमृता ज्वेलर्स (खडसंगी), आशिष रठे, नरेश चौधरी, मदन तराळे आणि प्रमोद श्रीरामे यांनी मोलाचे योगदान व सहकार्य दिले आहे. आपल्या सहकार्यामुळे स्मशानभूमीत नागरिकांसाठी आवश्यक ती बैठक व्यवस्था उपलब्ध झाली आहे. समाजहितासाठी मान्यवरांनी दाखविलेली बांधिलकी व केलेले सहकार्य निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. - प्रमोद श्रीरामे बरडघाट

# सोने दरात घसरणीचा ट्रेंड कायम, दिवाळीपर्यंत सोन्याचे दर आणखी कमी होणार?

नवरात्री आणि दसऱ्याच्या दरम्यान सोन्याच्या दरातील घसरणीमुळं सोने खरेदी करणाऱ्यांची आशा वाढली आहे. दसरा - दिवाळीच्या दरम्यान भारतात सोन्याची खरेदी वाढते. यामुळं दरांमध्ये घसरण कायम राहिल्यास दागिने खरेदी करणाऱ्यांना फायदा होईल.सोन्याच्या दरांमध्ये आंतरराष्ट्रीय घडामोडीमुळं निर्माण झालेला तणाव, कच्चा तेलाच्या दरातील वाढ, अमेरिकेच्या व्याज दरासंदर्भातील अनिश्चितता याचा सोन्याच्या दरावर परिणाम झाला आहे.

मल्टी कमोडिटी एक्सचेंजवरील आकडेवारीनुसार सोन्याच्या दर १४७३०० रुपये प्रति १० ग्रॅम आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात स्पॉट गोल्डचा दर ४१३८ डॉलर प्रति औंसवर आला आहे. डिसेंबरच्या वायद्याचे गोल्ड फ्युचर्सचे दर ४१४८.५० डॉलर्स प्रति औंसवर आला आहे.

सोन्याच्या दरातील घसरणीचं प्रमुख कारण क्रूड ऑईलच्या दरातील वाढ हे आहे. आखाती देशांमधील वाढत्या भूराजनैतिक तणावामुळं तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. रिपोर्टनुसार ब्रेंट क्रूड ऑईलचे दर ५ महिन्याच्या उच्चांकावर पोहोचले आहेत.

येमेनच्या इराण समर्थित हुती गटानं सौदी अरेबियाच्या ऊर्जा प्रकल्पांवर, विमानतळावर आणि सैन्य तळांवर हल्ले होत असल्यानं बाजारातील चिंता वाढली आहे. कच्चा तेलाचे दर वाढल्यानं ट्रान्सपोर्ट, उत्पादन खर्च वाढतो. यामुळं जगभरातील केंद्रीय बँका व्याज दरात कपात करण्यापासून लांब राहतात.



सोने महागाई आणि आर्थिक अनिश्चिततेच्या काळात लोकप्रिय पर्याय मानला जातो. सोन्याचे आगामी काळातील दर निश्चित करण्यासाठी अमेरिकेच्या फेड रिझर्व्हची भूमिका महत्त्वाची ठरते.

गुंतवणूकदार २७ आणि २८ ऑक्टोबरला होणाऱ्या फेडरल रिझर्व्हच्या बैठकीकडे गुंतवणूकदारांचं लक्ष लागलेलं आहे. व्याज दर स्थिर राहिल्यास किंवा ते न वाढल्यास सोन्याच्या दरांना आधार मिळू शकतो. जर व्याज दर दीर्घकाळ उच्च राहणार असल्याचे संकेत मिळाल्यास सोन्याच्या दरावर दबाव पाहायला मिळू शकतो. दिवाळीपर्यंत सोन्याच्या दरात वाढ होणार की सोन्याचे दर घसरणार हे क्रूड ऑईलचे दर किती वाढतात यावर अवलंबून असेल. जर क्रूड ऑईलचे दर वाढले आणि अमेरिकेच्या व्याज दरात वाढीची शक्यता वाढल्यास सोन्याच्या दरात तेजी आणि घसरण पाहायला मिळू शकतात.

# जिओ प्लॅटफॉर्म्सच्या खझज विक्रीला बोली सुरू झाल्यानंतर पहिल्या दोन तासांच्या आत जबरदस्त प्रतिसाद

जिओ प्लॅटफॉर्म्सच्या ३०,२१३ हजार कोटी रुपयांच्या सुरुवातीच्या सार्वजनिक समभाग विक्रीला आज (२१ ऑक्टोबर) रोजी, बोली सुरू झाल्यानंतर पहिल्या दोन तासांच्या आतच पूर्ण प्रतिसाद मिळाला. मोठ्या भारतीय आयपीओंच्या तुलनेत ही विक्रमी गती आहे. सकाळी १०:४५ वाजता, म्हणजेच बोली सुरू झाल्यानंतर सुमारे १०० मिनिटांतच, एकूण ऑफर केलेल्या शेअर्सच्या १०१ टक्के बोली मिळाल्या होत्या. यामध्ये पात्र संस्थात्मक गुंतवणूकदारांनी आघाडी घेतली असून, त्यांच्यासाठी राखीव असलेल्या भागाला ३३.२५ पट जास्त बोली मिळाली. हा भारतीय भांडवली बाजारातील आतापर्यंतचा सर्वात मोठा आयपीओ असून, यात कोणताही 'ऑफर-फॉर-सेल' भाग नाही, तर सर्व शेअर्स पूर्णपणे नवीन आहेत. कंपनी या निधीचा मुख्य वापर आपले कर्ज फेडण्यासाठी करणार आहे. संस्थात्मक गुंतवणूकदारांचा पुढाकार सुरुवातीच्या ३० मिनिटांतच टखइ चा कोटा पूर्ण भरला होता. सकाळी पावणे अकरापर्यंत या श्रेणीतील मागणी ३.२५ पटीवर पोहोचली होती. इतर श्रेणींमध्ये मात्र सुरुवातीला कमी प्रतिसाद होता; अनिवासी गुंतवणूकदारांच्या कोट्यासाठी २७ टक्के, तर किरकोळ गुंतवणूकदारांच्या कोट्यासाठी २४ टक्के बोली लागल्या होत्या. तसेच, कर्मचाऱ्यांच्या कोट्याला ५९ टक्के आणि




रिलायन्स इंडस्ट्रीजच्या जुन्या भागधारकांसाठी असलेल्या भागाला ४५ टक्के प्रतिसाद मिळाला. ग्रे मार्केट प्रीमियम या अहवालानुसार जिओ प्लॅटफॉर्म्सचा ग्रे मार्केट प्रीमियम २६८ रुपये होता. आयपीओची किंमत प्रति शेअर १०६५ ते १११९ रुपये निश्चित करण्यात आली असून, यावरून वरच्या किंमतीच्या तुलनेत जवळपास २४ टक्के प्रीमियम दर्शवला जात आहे. (जीएमपी हा एक अनधिकृत बाजारदर्शक असून, प्रत्यक्ष लिस्टिंग याहून वेगळी असू शकते.)

इतर मोठ्या आयपीओंच्या तुलनेत वेग बजाज हाऊसिंग फायनान्सचा ६,५६० कोटी रुपयांचा आयपीओ पहिल्या दिवशी दुपारी दोन वाजेपर्यंत पूर्ण भरला होता. तर एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाचा आयपीओ पहिल्या दिवसाच्या शेवटी पूर्ण भरला होता. मात्र, जिओ प्लॅटफॉर्म्सने अवघ्या दोन तासांत हा टप्पा पार करून नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे.

# रिलायन्स इंडस्ट्रीजचा १९७७ मधील खझज: धीरूभाई अंबानींच्या एका निर्णयाने सर्वसामान्यांना दिली श्रीमंत होण्याची संधी!

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचा १९७७ मधला पहिला खझज हा भारतीय उद्योगविश्वाच्या इतिहासातला एक महत्त्वाचा टप्पा होता. या खझज मुळे सामान्य माणसालाही एका वेगाने वाढणाऱ्या कंपनीत पैसे गुंतवण्याची संधी मिळाली. रिलायन्सचे संस्थापक धीरूभाई अंबानी यांच्या विचारांमुळे भारतीय कुटुंबांमध्ये शेअर बाजारातील गुंतवणुकीबद्दल उत्सुकता निर्माण झाली. त्या काळात शेअर बाजारात पैसे गुंतवणं ही फारशी सामान्य गोष्ट नव्हती. एबीपी न्यूजच्या प्राइम टाइमवरील 'जनहित' या कार्यक्रमात या ऐतिहासिक घटनेची चर्चा करण्यात आली. अँकर चित्रा त्रिपाठी यांनी सूत्रसंचालन केलेला हा कार्यक्रम काल संध्याकाळी प्रसारित झाला. रिलायन्सने सुरुवातीच्या काळात पैसे उभे करण्यासाठी केलेल्या या प्रयत्नातून कंपनीच्या विस्ताराची आणि सामान्य भारतीय कुटुंबांच्या आर्थिक स्वप्नांची सांगड कशी घातली गेली, हे या कार्यक्रमात सांगण्यात आलं.सामान्य गुंतवणूकदारांसाठी नवी संधी

१९७७ मध्ये रिलायन्सचा खझज आला आणि कंपनीने सर्वसामान्य लोकांसाठीही गुंतवणुकीची संधी खुली केली. त्यामुळे केवळ मोठे व्यावसायिक किंवा श्रीमंत लोकच नाही, तर सामान्य नागरिकांनाही कंपनीच्या विकासात सहभागी होता येऊ लागलं.अनेक कुटुंबांसाठी देशातील वाढत्या उद्योगविश्वाशी जोडून घेण्याचा हा एक नवा मार्ग होता. ज्या गुंतवणूकदारांनी रिलायन्सचे समभाग खरेदी करून ते आपल्याकडेच ठेवले, त्यांना कंपनीचा व्यवसाय वाढल्यानंतर फायदा मिळण्याची शक्यता होती. मात्र, प्रत्यक्षात किती फायदा झाला, हे प्रत्येकाने किती समभाग खरेदी केले, ते किती काळ स्वतःकडे ठेवले आणि त्या काळात शेअर बाजाराची परिस्थिती कशी होती, यावर अवलंबून होतं. कंपनीचा विस्तार करण्यासाठी पैसे उभे करतानाच सामान्य लोकांनाही कंपनीशी जोडून घेण्याचा धीरूभाई अंबानी यांचा दृष्टिकोन या निर्णयातून दिसून आला.

छोट्या गावातून मोठ्या उद्योगसमूहापर्यंतचा प्रवास

गुजरातमधील एका छोट्या गावात शिक्षकाच्या कुटुंबात जन्मलेल्या धीरूभाई अंबानी यांनी पुढे एक मोठा औद्योगिक उद्योगसमूह उभा केला. त्यांच्या या प्रवासाने मोठा व्यवसाय उभारण्याची क्षमता केवळ प्रस्थापित व्यावसायिक घराण्यांकडेच असते, हा समज बदलण्यास मदत केली. त्यांच्या व्यावसायिक विचारांमध्ये मोठी स्वप्नं पाहणं, व्यवसायाचा विस्तार करणं आणि सामान्य लोकांनाही कंपनीच्या प्रगतीत




सहभागी होण्याची संधी देणं याला महत्त्व होतं. रिलायन्सचा व्यवसाय जसजसा वाढत गेला, तसतशी ही विचारसरणी कंपनीच्या ओळखीचा महत्त्वाचा भाग बनली. काळानुसार रिलायन्स देशातील मोठ्या उद्योगसमूहांपैकी एक बनली. या प्रवासातून दीर्घकाळासाठी शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास संपत्ती निर्माण होण्याची शक्यता असते, हेही दिसून येतं. मात्र, बाजारातील चढ-उतार आणि गुंतवणुकीचे निर्णय यामुळे नुकसान होण्याची जोखीमही असते.

# 'अखेर अंत सत्य आणि चांगुलपणाचा होईल...'; जाहीर कार्यक्रमात बोलताना फसला 'रामायण' फेम रणबीर कपूर, ट्रोल झाल्यानंतर मागितली माफी

बॉलिवूड स्टार रणबीर कपूर सध्या त्याच्या बहुप्रतिक्षित 'रामायण' सिनेमामुळे चर्चेत आहे. हा सिनेमा ५ नोव्हेंबर रोजी थिएटर्समध्ये रिलीज होणार आहे. नुकतंच, सिनेमाच्या प्रमोशनचा भाग म्हणून रणबीर कपूर एका दसरा कार्यक्रमाला उपस्थित राहिला होता. मात्र, या कार्यक्रमादरम्यान घडलेल्या एका चुकीच्या घटनेमुळे, आता सोशल मीडियावर त्याला जोरदार ट्रोलिंगचा सामना करावा लागतोय.

आता रणबीर कपूरनं सत्य आणि चांगुलपणाच्या अंतिम विजयाबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल रणबीर कपूरनं माफी मागितली आहे. त्यानं स्पष्ट केलंय की, हे वक्तव्य त्याच्याकडून अनावधानानं, चुकीमुळे केलं गेलंय. २० ऑक्टोबर रोजी दसऱ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात करण्यात आलेलं. त्याच्या या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला. त्यानंतर त्याला मोठ्या प्रमाणावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला. दरम्यान, २१ ऑक्टोबर रोजी चेन्नई इथे, आपल्या 'रामायण' सिनेमाच्या भव्य संगीत कार्यक्रमात आणि संपूर्ण अल्बमच्या लाँचप्रसंगी रणबीरनं यावर स्पष्टीकरण दिलं. रणबीरकडून बोलताना मोठी चूक

दसरा कार्यक्रमाला उपस्थित असताना रणबीर कपूरनं एक विशेष भाषण दिलं. मात्र, त्याच्याकडून एक मोठी चूक झाली, ज्यावरून सोशल मीडियावर लोक त्याची खिल्ली उडवून त्याला ट्रोल करत आहेत. आपल्या भाषणात रणबीर कपूरनं म्हटलं की, दसरा हा एक सुंदर संदेश देतो की, वाईट प्रवृत्ती कितीही शक्तिशाली असली, तरी शेवटी सत्य आणि चांगुलपणाचाच विजय होतो. पण त्याच्याकडून एक चूक झाली, 'सत्य आणि चांगुलपणाचा विजय होईल', असं म्हणण्याऐवजी, त्यानं असं म्हटलं की, शेवटी, सत्य आणि चांगुलपणाचा अंत होईल... नेटकऱ्यांकडून रणबीर कपूर ट्रोल




रणबीर कपूरनं बोलताना केलेल्या चुकीमुळे त्याला मोठ्या प्रमाणावर ट्रोलिंगचा सामना करावा लागतोय. लोक रणबीरची थट्टा करत आहेत आणि अनेकजण त्याला ट्रोल करत आहेत. ट्रोल करणाऱ्यांचा प्रश्न आहे की, ज्या व्यक्तिच्या तोंडून सत्याचा अंत करणार... असे शब्द बाहेर पडतात, ती व्यक्ती भगवान रामाची भूमिका कशी काय साकारू शकते? मात्र, या टीकेच्या दरम्यान रणबीरचे चाहते त्याच्या समर्थनासाठी पुढे आले आहेत. त्यांच्या मते, मोठ्या गर्दीमुळे रणबीर कदाचित थोडा गोंधळला असावा, ज्यातून ही चूक घडली.

'अखेर अंत सत्य आणि चांगुलपणाचा होईल...'; जाहीर कार्यक्रमात बोलताना फसला 'रामायण' फेम रणबीर कपूर, ट्रोल झाल्यानंतर मागितली माफी, घडलं काय?

या टीकेनंतर रणबीर कपूरनं माफी मागितली असून, ही केवळ एक शाब्दिक चूक असल्याचं स्पष्ट केलंय.

'रामायण' सिनेमाबाबत बोलायचं झालं तर, यात रणबीर कपूर भगवान प्रभू श्रीरामाच्या भूमिकेत दिसणार आहे, तर साई पल्लवी माता सीतेची भूमिका साकारणार आहे. या सिनेमात यश रावणाच्या भूमिकेत, सनी देओल हनुमानाच्या भूमिकेत आणि रवी दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत दिसणार आहे. चाहत्यांमध्ये या सिनेमाबद्दल प्रचंड उत्साह आहे आणि ॲडव्हान्स बुकिंग देखील जोरात सुरू आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' सिनेमा बॉक्स ऑफिसवर कशी सुरुवात करतो, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

## काव्या मारन अन् अनिरुद्ध रविचंदर नोव्हेंबरमध्ये लग्न करणार?

एकीकडे 'जेलर २' या सिनेमाची चर्चा सुरू आहे. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. अशातच संगीतकार अनिरुद्ध रविचंदर




आपल्या पर्सनल लाइफमुळे चर्चेत आहे. अनिरुद्ध रविचंदर लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याची माहिती आहे. खड्ङ टीम 'सनरायझर्स हैदराबाद'ची मालकिन काव्या मारनसोबत लग्न करणार असल्याची माहिती आहे. बऱ्याच दिवसांपासून याची चर्चा सुरू आहे. नोव्हेंबर २०२६ रोजी लग्न करणार असल्याची माहिती आहे. ११ नोव्हेंबरला ग्रीसमध्ये हे कपल लग्नबंधनात अडकणार आहे. तर, ११ नोव्हेंबरला वेडिंग रिसेप्शन पार पडणार, अशी माहिती आहे. दरम्यान, दोघांकडून अद्याप लग्न आणि रिसेप्शनबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

वलई पेच्चु यांच्या रिपोर्टनुसार, अनिरुद्ध रविचंदर आणि काव्या मारन या दोघांचं लग्न ११ नोव्हेंबर रोजी पार पडणार, अशी माहिती आहे. ग्रीसमध्ये दोघेही लग्नाच्या बेडीत अडकणार आहे, अशी चर्चा आहे. तर, चेन्नईमध्ये ११ नोव्हेंबर रोजी वेडिंग रिसेप्शन पार पडणार आहे, अशी बातमी आहे. आता असं म्हटलं जात आहे की, २१ नोव्हेंबरला वेडिंग रिसेप्शन होणार आहे. हे वेडिंग रिसेप्शन फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये होणार आहे. तेलंगणा सीएमओने एक फोटो शेअर केला आहे. रिपोर्टनुसार, काव्या मारन आणि अनिरुद्ध यांचे वेडिंग रिसेप्शन २१ नोव्हेंबर रोजी चेन्नई येथे पार पडणार आहे. काव्या मारन आणि अनिरुद्ध रविचंदर यांच्यातील वयात अंतर किती? ६ ऑगस्ट १९९२ रोजी चेन्नई येथे काव्या मारनचा जन्म झाला. चेअरमन कलानिधी मारनची काव्या मुलगी आहे. काव्या मारनच्या आईचं नाव कावेरी मारन असे आहे. काव्या मारनने चेन्नईतील स्टेला मॅरिस कॉलेजमधून कॉमर्सची डिग्री घेतली. तर, वारविक बिझनेस स्कूलमधून एमबीए पूर्ण केले. तिचे वडील सनराइजर्स हैदराबादचे को-ओनर आहेत. काव्या मारन आयपीएलमधील सुप्रसिद्ध चेहरा आहे. तिचा नेटवर्थ साधारण ४०९ कोटी इतका आहे. तर, अनिरुद्ध रविचंदर याचा नेटवर्थ ५० कोटी इतका आहे. दोघांच्या वयाच्या अंतरबद्दल बोलायचं झाल्यास, काव्या मारन सध्या ३४ वर्षांची आहे. तर, अनिरुद्ध रविचंदर याचा जन्म १६ ऑक्टोबर १९९० रोजी झाला. अनिरुद्ध रविचंदर ३६ वर्षांचा आहे. दोघांमध्ये २ वर्षांचा अंतर आहे.

## झी मराठी अवॉर्ड्स २०२६ चा नामांकन सोहळा दणक्यात पार!

कलाकारांच्या मेहनतीचा आणि त्यांच्या लोकप्रियतेचा गौरव करणारा 'झी मराठी अवॉर्ड्स २०२६'हा छोट्या पडद्यावरील एक मानाचा सोहळा आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही या पुरस्कार सोहळ्याची कलाकारांसोबतच प्रेक्षकही आतुरतेने वाट पाहत आहेत. यंदाच्या 'झी मराठी अवॉर्ड्स २०२६' च्या नामांकन सोहळ्यातही हीच उत्सुकता, उत्साह आणि जल्लोष पाहायला मिळाला. 'सहलीला जायचं.. जायचं सहलीला!' या थीमवर झालेल्या या सोहळ्यात झी मराठी परिवारातील कलाकारांनी आपल्या हटके आणि स्टायलिश अंदाजाने रेड कार्पेटवर रंगत आणली.



झी मराठी अवॉर्ड्स २०२६ चा रंगला नामांकन सोहळा यंदाच्या थीमला साजेसा फुलांचा बहर, पेस्टल रंग आणि फ्रेश लूक्स असा कलाकारांचा अंदाज पाहायला मिळाला. अनेक कलाकारांनी आपल्या लूकमध्ये खास प्रयोग करत स्वतःची क्रिएटिव्हिटी दाखवली. काहींनी खास डिझाइन केलेले पोशाख परिधान केले, तर काही कलाकारांनी हटके ॲक्सेसरीजने आपला लूक उठावदार केला. 'वीण दोघांतली ही तुटेना' मधील तेजश्री प्रधान म्हणजेच स्वानंदीने सुंदर साडीतील एलिगंट अंदाजात उपस्थिती लावली. तर केतकी कुलकर्णीच्या फ्लोरल बास्केटने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## टायगर श्रॉफ नाही, रणबीर कपूर होता हल्लेखोरांच्या निशाण्यावर?

अभिनेता टायगर श्रॉफ याच्या गाडीवर झालेल्या गोळीबारात सुदैवानं तो थोडक्यात बचावला. त्याच्या गाडीवर तब्बल सहा ते सात राउंड फायर करण्यात आलेले. टायगर सीटवर मागच्या बाजूला




सरकून बसल्यामुळे तो वाचला, पण त्याचा ड्रायव्हर जखमी झाला. या प्रकरणानं बॉलिवूडमध्ये खळबळ माजली आहे. पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्र फिरवली आणि आरोपींना अटक केली. आता या प्रकरणी आरोपींच्या चौकशीतून अनेक धक्कादायक गोष्टी उघड होत आहेत. टायगर श्रॉफच्या आधी आरोपींनी अमिताभ बच्चन, आमीर खान आणि अक्षय कुमार याच्या घराची रेकी केल्याचं समोर आल्यानंतर खळबळ माजलेली. अशातच आता आणखी एका सुपरस्टार अभिनेत्याचं नाव समोर आलं आहे. टायगरवर हल्ला करण्याचं फायनल करण्यापूर्वी आरोपींनी रणबीर कपूरच्या घराचीही रेकी केलेली.

मीडिया रिपोर्टनुसार, टायगरवर हल्ला करणारे हल्लेखोर बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरच्या वांद्रे इथल्या घराची रेकी करत होते. या बातमीमुळे रणबीर कपूरचे चाहते, चिंतेत पडले असून बॉलिवूड पुन्हा एकदा हादरुन गेलंय.

अभिनेता सलमान खान आणि आमिर खान यांच्यासह रणबीर कपूरच्या घराची देखील रेकी करण्यात आली होती. अभिनेता सलमान खान जरी आरोपींच्या मुख्य निशाण्यावर असला, तरीसुद्धा सलमान खानची सुरक्षा भेदणं शक्य नसल्याचं समजताच हल्लेखोरांनी आपल्या मोर्चा इतर सेलिब्रिटींकडे वळवला. त्यात अमिताभ बच्चन, अक्षय कुमार, आमीर खान आणि रणबीर कपूर यांच्या घराची रेकी केली. पण, लो प्रोफाईल आणि सुरक्षेचं जाळं नसल्यामुळे हल्लेखोरांनी टायगर श्रॉफची निवड केली.

## १०० व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाला सई परांजपेंचा नकार



शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक, निर्मात्या आणि लेखिका सई परांजपे यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून विचारणा करण्यात आली होती. पण, सई परांजपे यांनी अध्यक्षपदाला नकार कळवला आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून त्यांना विनंती करण्यात आलेली. तसेच, शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद सई परांजपे भूषवणार, अशा चर्चांनाही उधाण आलेलं. पण, त्यांनी यासाठी नकार दिल्यामुळे आता अध्यक्षपदी कोण? हा प्रश्न कायम आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे स्थानिक कार्यवाह सुनील महाजन यांनी सई परांजपे यांच्याशी संपर्क साधला होता आणि ऐतिहासिक शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच अध्यक्षपद स्वीकारावं, अशी विनंती केली होती. मात्र, सई परांजपे यांनी त्यांना नकार कळवलाय.

ऐतिहासिक शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाला नकार का दिला? ऐतिहासिक शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाला दिग्दर्शक, निर्मात्या आणि लेखिका सई परांजपे यांनी स्पष्ट नकार दिला आहे. तसेच, नकारासाठी त्यांनी आपल्या तब्येतीचं कारण दिलंय, अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे स्थानिक कार्यवाह सुनील महाजन यांनी दिलीय.

## बड्या डिझायनरचे महागडे आऊटफिट्स नाही, माधुरी दीक्षितनं लग्नात नेसलेली जुनी साडी

'कोण होणार करोडपती'च्या मंचावर प्रश्न जरी स्पर्धकांना कोड्यात पाडत असले, तरी सोनी मराठीवरील या शोमध्ये रंगणाऱ्या गप्पा माधुरी दीक्षितला मनसोक्त हसण्याची अनेक कारणे देत आहेत. हलक्या-फुलक्या गप्पांपासून ते मनाला भिडणाऱ्या संवादांपर्यंत, प्रेक्षकांना माधुरीची एक वेगळी, वैयक्तिक बाजू पाहायला मिळत आहे, जिथे ती आपल्या आठवणी शेअर करत या प्रवासाचा आनंद घेत आहे.

नुकतीच डॉ. श्रीराम नेने यांच्यासोबत आपल्या लग्नाची २७ वी ॲनिवर्सरी साजरी केली. 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर माधुरीनं तिच्या स्वतःच्या लग्नाच्या आठवणींना उजाळा दिला. आणि याचं निमित्त ठरली अमरावतीची स्पर्धक आणि होणारी मृण्मयी किटुकले हिनं 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर केलेली ही खास गोष्ट. आपल्याकडे लग्नाची पत्रिका पहिल्यांदा देवाला वाहण्याची प्रथा असली, तरी मृण्मयीनं आपली पहिली पत्रिका माधुरीला देऊन तिला सगळ्यांच्या आधी आपल्या आनंदात सामील करून घेतलं.

यावेळी लग्नाविषयी गप्पा सुरू असताना मृण्मयीनं माधुरीकडे ब्रायडल स्टायलिंग टिप्स मागितल्या. तसेच, तिनं इन्स्पिरेशनसाठी माधुरीच्या साडी लुक्सचे स्क्रीनशॉट्स सेव्ह करून ठेवल्याचं सांगितलं आणि लग्नाच्या दिवशी काय नेसावं? याबद्दल सल्ला विचारला. पारंपारिक भडक रंग आणि सध्या




ट्रेंडमध्ये असलेले पेस्टल कलर्स यावर चर्चा करताना माधुरी दीक्षितनं तिच्या लग्नाच्या वेळच्या खास साडीचा किस्सा सांगितला. तिनं तिच्या लग्नात आजीची सुंदर निळ्या रंगाची नऊवारी साडी नेसली होती आणि त्यावर एम्ब्रॉयडरी केलेली शाल घेतली होती, अशी आठवण माधुरी दीक्षितनं यावेळी सांगितली.

आपल्या लग्नाच्या पोशाखातील या भावनिक आणि वैयक्तिक स्पर्शाची आठवण करून देत माधुरी दीक्षित म्हणाली, मी माझ्या लग्नात माझ्या आजीची साडी नेसलेली. नऊवारी साडी. आणि ती अशी ब्लू कलरची होती. खूप सुरेख ब्लू होता. आणि त्याच्यावर मी शाल घेतली होती, ज्याच्यावर फुलांची एम्ब्रॉयडरी केलेली होती. तर असा पर्सनल टच त्यात असला पाहिजे...